**Arts & Commerce College, Warwat Bakal**
**Tq. Sangrampur Dist. Buldana**

**Research Papers 2020-2021**

| Sr. No | Title of Paper | Name of Author | Department | Journal | Year | Impact Factor |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Dr Babasaheb Ambedkar & Samajkranti | R S Korde | Pol-Science | International Peer Reviewed Refereed &UGC Listed Journal No. 47026 www.sjifactor.com & www.ajantaprakashan.com | 2020 | 6.601 |
| 2 | Women Empowerment & Human Right | R S Korde | R S Korde | International Peer Reviewed & Refreed Indexed Research Journal (www.adharsocial.com | 2020 | 7.675 |

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
(Journal No. 47026)

# IDEAL

ISSN 2319 - 359X

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL



Volume - IX, Issue - II
March - August - 2021
Marathi Part - I

Impact Factor / Indexing
2019 - 6.601
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

2020-21

ISSN 2319 - 359X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# IDEAL

Volume - IX | Issue - II | March - August - 2021

Marathi Part - I

Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal No. 47026

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.601
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖
Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर व समाजक्रांती<br>**डॉ. राजेंद्र कोरडे** | १-५ |
| २ | कोरोना व्हायरसच्या संकटात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची अर्थनिती कशी महत्त्वाची आहे<br>**डॉ. सुरजकुमार एस. प्रसाद** | ६-१० |
| ३ | राज्यघटना आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**डॉ. अनंत चौधरी**<br>**विक्रम पंडित राठोड** | ११-१९ |
| ४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय आणि सामाजिक लोकशाही विचार<br>**प्रा. डॉ. योगेश दा. उगले** | २०-२३ |
| ५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिला कामगार विषयक विचार व कार्य : एक अभ्यास<br>**सहा. प्रा. दिगंबरकुमार प्रल्हादराव लांडगे** | २४-२६ |
| ६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिला सुधारणा विषयक कार्य<br>**प्रा. रवींद्र म. कांबळे** | २७-३० |
| ७ | भारतीय जलनीतीचे प्रणेते : डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**डॉ. भालेराव जे. के.** | ३१-३४ |
| ८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेतकऱ्यांसाठी केलेले कार्य<br>**डॉ. आर. यु. हिरे** | ३५-३७ |
| ९ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक विचार आणि सद्यस्थितीतील उपयुक्तता<br>**डॉ. साधना वाल्मिक पाटील** | ३८-४२ |
| १० | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार<br>**प्रा. डॉ. विजयकुमार रा. सोनी** | ४३-४६ |
| ११ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा दलित कथेवरील प्रभाव चिकित्सा<br>**डॉ. लोणे राजेंद्रकुमार लक्ष्मणराव** | ४७-५० |
| १२ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार<br>**डॉ. शकुंतला मिठाराम भारंबे** | ५१-५५ |

VOLUME - IX, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2021
IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 6.601 (www.sjifactor.com) 

# १. विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर व समाजक्रांती

**डॉ. राजेंद्र कोरडे**
कला व वाणिज्य महाविद्यालय, वरवट-बकाल.

आधुनिक भारताच्या जडणघडणीत अनेकांनी सामाजिक समता निर्माण करण्याचे प्रयत्न केलेत राजा राम मोहन रॉय, महात्मा फुले, शशिधर बंडोपाध्याय, सयाजीराव गायकवाड, छत्रपती शाहू महाराज यांनी सामाजिक चळवळ जीवंत ठेवून सामाजिक क्षेत्रात भरीव काम केले. त्यांनी भारतीय समाजव्यवस्थेला एक नवी दिशा प्रदान केली. हीच समाजपरिवर्तनाची कास डॉ. आंबेडकरांनी धरून आपल्या सामाजिक चळवळीचा पाया घातला. त्याच आधारावर त्यांनी एक विशिष्ट ध्येय, उद्देश आणि प्रामाणिक हेतू असलेली मोठी जनसामान्यांची सामाजिक चळवळ उभी करून प्रचलित भारतीय समाजव्यवस्थेला हादरवून सोडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 1920 सालापासून आपल्या सामाजिक कार्याला सुरुवात केली. त्यासाठी त्यांनी 'बहिष्कृत हितकारिणी सभे'ची स्थापना करून सामाजिक चळवळीचा प्रारंभ केला. अनेक जनआंदोलने उभी केलीत. त्या प्रत्येक जनआंदोलनातून त्यांनी प्रस्थापित समाजव्यवस्थेचे खरे रूप दलित वर्गापुढे ठेवले. त्यामुळे त्यांना त्यांच्या अवनतीची खरी जाणीव होऊन डॉ. आंबेडकरांच्या विचारांनी अस्पृश्य समाजात परिवर्तनाचे वारे वाहू लागले. दलितांनी परंपरागत धंदे, व्यवसाय, राहणीमान, विचार यांचा त्याग करून डॉ. आंबेडकरांनी सुचविलेला प्रगतीचा मार्ग अंगीकारला आणि खऱ्या अर्थाने सामाजिक क्रांतीला सुरुवात झाली.

भारतीय समाजाच्या इतिहासात शोषित समाजाच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी झटणारे व गुलामाला गुलामीची जाणिव करुन द्या म्हणजे तो पेटून उठल्याशिवाय राहणार नाही हे तत्व सांगणारे आणि सामाजिक अन्यायाच्या विरोधात संघर्ष करुन हजारो वर्षापासून गावकुसाबाहेर अज्ञानाच्या अंधारात चाचपडणाऱ्या समाजाला जाती–धर्माच्या बेडया तोडून, परंपरेच्या जोखंडातून मुक्त करुन मानवी मुल्यांच्या प्रकाशात पहिल्यांदा उभे करणारे महान तत्वज्ञानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर. माणसाने माणसाला माणूस म्हणून गळयाला लावले पाहिजे. माणसांचा माणसांनी सन्मान केला पाहिजे. माणसाने माणसाच्या माणुसकीचे जग उभे केले पाहिजे. जगातील सर्व माणसे गुण्या–गोविंदाने नांदली पाहिजे. स्वातंत्र, समता आणि विश्वबंधुता जगात नांदली पाहिजे. या विचाराचा पाया रोवणारे व अखंड भारताचे स्वप्न पूर्णत्वास नेणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे खरे एकमेवद्वितीय विश्वरत्न आहेत. निराशेच्या सुरातूनच मानवी संघर्ष जन्माला येतो. आणि संघर्ष हा निसर्गाचा नियम आहे. संघर्षाशिवाय मानवी विकासाला चालना मिळत नाही. जगातल्या अनेक राष्ट्रांमध्ये ज्या काही उलथापालथी झाल्याय त्या संघर्षातूनच झाल्या. संघर्ष हा लढयाचा केंद्रबिंदू आहे. मग तो शासन सत्तेच्या विरोधात असो की समाज परिवर्तनासाठी असो की जुलमी राजेशाहीच्या विरोधात असोय जगातले जितकेही परिवर्तन झाले ते संघर्षातूनच झाले आहे. संघर्षातूनच मानवी विकासाला गतिमानता येते. त्या संघर्षाचे नेतृत्व करणाऱ्या माणसाचा हेतू प्रामाणिक व सकारात्मक असला पाहिजे. मग त्याच्यातून चांगलं जन्माला आल्याशिवाय राहत नाही. विचारातूनच नव्हे तर प्रत्यक्ष कृतीतून डॉ. बाबासाहेब

आंबेडकरांनी हे सिद्ध करून दाखविले. आज भारतीय समाजव्यवस्थेचा बदललेला रूप हे डॉ. आंबेडकरांनी केलेल्या प्रस्थापित समाजव्यवस्थेविरूद्ध केलेल्या बंडाचे व संघर्षाचे फलित होय.

तत्कालिन समाजव्यवस्थेत अस्पृश्य म्हणवल्या गेलेल्या एका मोठया समूहाला समाज व्यवस्थेने दूर लोटले होते. त्यांचे जगने कुत्र्या–मांजराच्या पातळीवर आणून सोडले होते. त्यांना जनावराचे जिणे जगायला भाग पाडले होते. अशा शोषित समाजात युगपुरुष डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म झाला. त्यांनी शोषित समाजाचे नरकीय जिणे अनुभवले आणि त्यांनी शोषित समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी संघर्ष सुरु केला. 'गुलामाला गुलामीची जाणीव करुन द्या, मग तो पेटून उठल्याशिवाय राहणार नाही.' हे तत्व सांगितले. समाज जागृत केला. सामाजिक अन्यायाच्या विरोधात संघर्ष करुन शोषित समाजाचा उद्धार केला.

संपूर्ण देशात बहुसंख्य ठिकाणी अस्पृश्यांना सार्वजनिक पाणवठयावर पाणी भरण्याचा किंवा पिण्याचा अधिकार नव्हता. अस्पृश्यांना त्यांचा हक्क मिळवून देण्यासाठी बाबासाहेबांनी महाड येथे सत्याग्रह करण्याचे ठरवले. बाबासाहेबांनी 19 व 20 मार्च इ.स. 1927 रोजी महाड येथे कुलाबा परिषद भरवली. अध्यक्ष स्वतः बाबासाहेब होते. या परिषदेत अस्पृश्यतेचा धिक्कार करुन स्पृश (सवर्ण) लोकांनी अस्पृश्यांना आपल्या नोकरीत ठेवावेय स्पृश लोकांनी अस्पृश्यांना त्यांचे नागरीकत्त्वाचे अधिकार बजावण्याच्या कामात मदत करावीय मृत जनावरे ज्यांची त्यांनी ओढावी व स्पृशांनी अस्पृश्य विद्यार्थ्यांना वार लावून जेवण द्यावे हे ठराव पास झाले. परंतु प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी मात्र सर्वच स्तरावरून प्रचंड विरोध झाला. तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर या अन्यायाविरूद्ध पेटून उठले. व अवघ्या विश्वात झळ पोहोचेल एवढा सामाजिक क्रांतीचा वणवा पेटला ज्यात तत्कालीन समाजव्यवस्था होरपळून मृत पावली.

20 मार्च 1927 रोजी परिषदेतील सर्वांनी आपला मोर्चा चवदार तळयाकडे वळवला. बाबासाहेब सर्वप्रथम तळयातील पाणी ओंजळीने प्यायले. त्यानंतर अनुयायांनी त्यांचे अनुकरण केले. ही घटना रुढीवादी हिंदुंना सहन झाली नाही. त्यांनी दलितांच्या भोजनामध्ये माती मिसळली. त्यानंतर दलितांवर लाठया–काठयांनी हल्ले केले आणि 'अस्पृश्यांनी तळे बाटवले' असे म्हणून त्यात गोमुत्र टाकून तळयाचे ब्राम्हणांकडून शुद्धीकरण केले. पुढे महाडच्या नगरपालिकेने अस्पृश्यांना चवदार तळे खुले केल्याचा ठरावही रद्द केला. त्यामुळे बाबासाहेबांनी 25 व 26 डिसेंबर रोजी महाड येथे सत्याग्रह परिषद घेण्याचे ठरविले. या परिषदेचा उद्देश स्पष्ट करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, "आतापर्यंत आम्ही या तलावाचे पाणी पिऊ शकलो नाही. किंबहूना पिऊ दिले नाही. आता आम्ही पाणी प्यालो म्हणजे आमचे दुःख दूर होईल, आमची परिस्थिती सुधारेल किंवा आमच्यावरील अन्याय कमी होईल असा अर्थ नसून हा केवळ एका मानवाने दुसऱ्या मानवाला समानतेने कसे वागवावे हे सांगण्याचा व सर्व मानवाला समानतेचा अधिकार आहे हे दाखवण्याचा प्रयत्न आहे." केवळ पिण्याच्या पाण्यासाठी केलेला सत्याग्रह इतिहासातील पहिला आणि एकमेव सत्याग्रह म्हणून ओळखल्या जातो.

शूद्रावर अनेक प्रकारचे अन्याय ब्राम्हणी हिंदू वाडमयाने वा शास्त्राने केलेले होते. अशा प्रकारच्या वाडमयात सर्वात अग्रस्थानी असलेला वाङमय म्हणजे मनुस्मृती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते दलितांच्या सर्व समस्या या मनुस्मृतीमुळे निर्माण झालेल्या आहेत. हा ग्रंथ सुमारे 2000 वर्षापूर्वी मनूने लिहिला असला तरी तो रुढीवादी हिंदूंच्या जीवनाचे आजही नियंत्रण करतो.

शूद्रांनी सर्वतोपरी सर्वांच्या पायदळी असावे. त्यांना कोणत्याही प्रकारचे धार्मिक कार्य करता येऊ नये. त्यांनी शिक्षण घेऊ नये. त्यांना संपत्ती कमविण्याचा हक्क नव्हता. वरिष्ठ वर्गाची सेवाचाकरी हेच शूद्राचे मुख्य कर्तव्य आहे, धर्म आहे आणि त्यातच त्याची मुक्ती आहे. उच्चवर्णीयांनी शूद्रांशी आंतरजातीय विवाह करु नयेत. शूद्राची स्त्री रखेल म्हणून ते ठेवू शकतात. उच्चवर्णीय स्त्रीस शूद्राने नुसता स्पर्श जरी केला तरी त्यास जबर शिक्षा द्यावी. शुद्राचा जन्म गुलामगिरीत होतो आणि त्याने गुलामगिरीतच मरावे. अशा अनेक प्रकारचे जाचक व माणूसकीला कलंकीत करणारे बंधन तथाकथीत उच्चवर्णीयांनी शुद्रांवर लादली होती. मनुस्मृतीने कनिष्ठ जातींवर अनेक अपात्रता लादल्या तर उच्च जातीना अनेक विशेषाधिकार दिले. मनुस्मृती हा ग्रंथ अस्पृश्यांवर होणाऱ्या अन्यायाचे, कुरतेचे व विषमतेचे प्रतीक आहे. म्हणून मनुस्मृतीचे 25 डिसेंबर इ.स. 1927 रोजी समारंभपूर्वक जाहीरपणे दहन केले.

1938 मध्ये दिलेल्या एका मुलाखतीत स्वतः बाबासाहेबांनी मनुस्मृती दहनाच्या प्रतीकात्मक स्वरुपावर जोर देऊन म्हटले होते, ते एक दक्षतेचे उचललेले आक्रमक पाऊल होते. परंत ते सवर्ण हिंदंचे लक्ष वेधून घेण्यासाठी उचललेले होते. अधूनमधून अशा प्रकारचे उपाय योजावे लागतात. तुम्ही दार ठोठावलेच नाही, तर ते कोणी उघडणार नाही. मनुस्मशतीचे सर्व भाग टाकाऊ आहेत आणि त्यात चांगली तत्वे मुळीच नाहीत किंवा मनु स्वतः समाजशास्त्रज्ञ नव्हता, तर केवळ मूर्ख माणूस होता, असा त्याचा अर्थ नाही. आम्ही मनुस्मशतीचे दहन केले ते शतकानुशतके आम्ही ज्या अन्यायाखाली चिरडले गेलो त्याचे प्रतीक म्हणून कनिष्ठ जातीतील लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा व त्यांची सामाजिक–आर्थिक स्थिती सुधारावी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 20 जुलै रोजी मुंबई येथे 'बहिष्कृत हितकारिणी सभे'ची स्थापना केली. सामाजिक व राजकीयदृष्टया तळागाळात फेकल्या गेलेल्यांना भारतीय समाजातील अतरांच्या बरोबरीने आणने, हे या सभेचे ध्येय होते. अस्पृश्यांना समाजाबाहेर ठेऊन, त्यांना नागरी, धार्मिक वा राजकीय हक्क देण्यात आले नव्हते. त्यांच्या अधिकारांप्रती त्यांच्यामध्ये जागश्ती निर्माण करणे हा उद्देश होता. आंबेडकरांनी सायमन कमिशनकडे एक पत्र सादर केले व त्यात त्यांनी मागासवर्गीयांसाठी नामनिर्देशन तत्वावर जागा आरक्षित ठेवण्यासंबंधी मागणी केली. तसेच भूदल, नौदल व पोलीस खात्यात मागासवर्गीयांची भरती करण्या संबंधीचीही मागणी केली होती. सभेमार्फत अस्पृश्यांच्या कल्याणासाठी शाळा, वसतिगश्हे व ग्रंथालये सुरु करण्यात आली.

स्पृश्य–अस्पृश्य संकल्पनेची पालेमुळे समाजात खोलवर रुतली होती. हिंदू असूनही हिंदूंच्या मंदिरात प्रवेश मिळत नसल्यामुळे तो समानतेचा अधिकार मिळविण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मंदिर प्रवेशाचा संघर्ष केला. हिंदू दलितांच्या मंदिर प्रवेशामुळे मंदिर व मंदिरातील मुर्ती अपवित्र वा अशुद्ध होत नाही, हे ही सिद्ध करण्याचा हेतू या चळवळीमागे होता.

14 जून 1928 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित शिक्षणसंस्थेची स्थापना केली. दलितांच्या माध्यमिक शिक्षणाची सोय करणे हे या संस्थेचे मुख्य ध्येय होते. दलित विद्यार्थ्यांना वसतिगश्हाची सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या कार्यासाठी मुंबई सरकारने या संस्थेस मदत करावी असे आवाहन बाबासाहेबांनी केले. कारण माध्यमिक शिक्षणाची जबाबदारी पेलण्यास ही संस्था समर्थ नव्हती. त्यामुळे मुंबईच्या गव्हर्नरने 8 ऑक्टोंबर 1928 रोजी माध्यमिक शाहेतील विद्यार्थ्यांसाठी 5 वसतिगश्हे मंजूर केली. तसेच गव्हर्नरने दरमहा रु. 9000/– चे अनुदानही वसतिगश्हांना खर्चासाठी मंजूर केले. जेव्हा ही रक्कम खर्चासाठी अपूरी पडू लागली तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर

यांनी मुस्लीम व पारशी समुदायातील धर्मादाय संस्थांकडून व इतर काही देणगीदारांकडून आर्थिक मदत मिळविली. बाबासाहेबांच्या मते कोणत्याही समाजाचे मूल्यमापन त्या समाजातल्या स्त्रियांची परिस्थिती कशी आहे यावरून करता येते. समाजाने स्त्रियांच्या विकासाकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक असल्याची त्यांची आग्रही भूमिका होती. ही समग्र प्रगती केवळ पुरुषांचीच नव्हे, तर स्त्रियांची देखील होणे गरजेचे आहे, हे भान त्यांना विद्यार्थीदशेतच आले होते. ते स्त्री शिक्षणाचे कट्टर पुरस्कर्ते होते. प्रत्येकाने आपल्या घरातल्या मुलीला शिक्षणाची संधी दिली तर हा विचार समाजात सर्वत्र पसरेल. समाजाची प्रगती व्हायला शिक्षणाचा प्रसार व्हायला हवा, असे त्यांचे ठाम मत होते. "शिक्षणामुळे मुली बिघडतात, हा विचार सर्वांनी मनातून काढून टाकला पाहिजे. आईवडिलांनी बालपणापासूनच मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष दिले पाहिजे. ब्राम्हणाच्या मुली जितक्या शिकतील तितक्या दलितांमधल्या मुली शिकल्या पाहिजेत" असे विचार ते वेळोवेळी मांडत. ते केवळ विख्चार मांडून थांबले नाहीत तर औरंगाबादला त्यांनी मिलींद महाविद्यालयाची स्थापना केली. इथे मुलींनाही प्रवेश दिला.

भारतीय समाज व्यवस्थेत घट्ट रूजलेली विषमता नष्ट करण्यासाठी झटणाऱ्या बाबासाहेबांना स्त्रियांवर होणारे अन्याय–अत्याचार अस्वस्थ करत होते. पितश्सत्ताक संस्कष्तीचा पगडाही लक्षात येत होता. स्त्रियांचे त्यांच्या मनाविरूद्ध झालेले विवाह आणि लादली जाणारी बाळंतपणेयाचाही परिणाम दिसत होता. ही परिस्थिती बदलण्याचे एकमेव प्रभावी साधन म्हणजे शिक्षण, यावर त्यांचा ठाम विश्वास होता. हा विचार समाजात रुजण्यासाठी त्यांनी आपल्या लेखांतून व्याख्यानांतून पोटतिडकीने मांडणी केली.

स्वतंत्र भारताचे पहिले मजूर मंत्री म्हणून बाबासाहेबांनी स्त्रियांच्या सक्षमीकरणाचे अनेक निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी केली. खाण कामगार स्त्रिला प्रसूती रजा, कोळसा खाणीत काम करणाऱ्या स्त्री कामगारांना पुरुषांइतकीच मजुरी, बहुपत्नीत्वाच्या प्रथेला पायबंद, मजूर व कष्टकरी स्त्रियांसाठी 21 दिवसाची किरकोळ रजा, एका महिन्याची हक्काची रजा, दुखापत झाल्यास नुकसान भरपाई आणि 20 वर्षाची सेवा झाल्यावर निवश्त्तीवेतनाची तरतूद यांसारख्या महत्वाच्या निर्णयांचा उल्लेख करायला हवा. कामगार किंवा नोकरी करणाऱ्या स्त्रीला प्रसूती रजा मिळवून देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जगातील पहिले व्यक्ती आहेत. भारतानंतरच अनेक वर्षांनी इतर देशातील महिलांना प्रसूती रजा मंजूर झाल्या आहेत.

बाबासाहेबांनी 1947 मध्ये कायदेमंत्री असतांना हिंदू संहिता विधेयक अर्थात हिंदू कोड बिल प्रस्ताव लोकसभेत मांडला. हिंदू वैयक्तिक कायद्यात एकाच वेळी काही परस्परपूरक पुरोगामी तत्वे समाविष्ट करण्याचे त्यांचे हे क्रांतीकारी पाऊल होते. अस्पश्श्यतेचे उच्चाअन, लग्नसंबंधातली स्त्री–पुरुष समानता, स्त्रियांना काडीमोड घेण्याचा अधिकार, वारसाहक्काचे लाभ स्त्रियांनाही देण्याची तरतूद या तत्वांचा यात समावेश होता. बाबासाहेबांच्या मते सामाजिक न्यायाचा लढा यशस्वी होण्यासाठी हिंदू समाजाच्या वैयक्तिक कायद्यामध्ये जाती व्यवस्थाआणि पुरुषप्रधानता यांना नकार देऊन समान वैयक्तिक संबंधाची पायाभरणी करणे आवश्यक होते. दुर्दैवाने या विधेयकाला लोकसभेत सत्तेतील व विरोधी पक्षातील सनातन्यांकडून प्रचंड विरोध झाला. हिंदू कोड बिलाच्या विरोधात वल्लभभाई पटेल व डॉ. राजेंद्र प्रसाद हे नेते प्रमुख होते. बाबासाहेबांना याचा खूप मनस्ताप झाला. शेवटी अनेक मुद्यासह या प्रमुख मुद्यावरून त्यांनी आपल्या कायदा मंत्रिपदाचा त्याग केला. हिंदू कोड बिलाचे काम संविधान निर्मितीएवढेच महत्वाचे होते, असे ते सांगत.

ज्या मतदानाच्या अधिकारासाठी युरोपमध्ये स्त्रियांना संघर्ष करावा लागला तो अधिकार भारतीय स्त्रियांना न मागताच बाबासाहेबांनी दिला. त्यांनी कुटुंबाचे योग्य नियोजन स्त्रियांशीच निगडीत असल्याची स्पष्ट भूमिका घेतलेली दिसते. स्त्रियांनी आपले हक्क मिळविण्यासाठी स्वतःही पुढे यायला हवे, हा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडला. बाबासाहेबांनी आपल्या चळवळीत स्त्रियांना आवर्जून सहभागी करून घेतले. 1927 चा महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह, 1930 चा नाशिकचा काळाराम मंदिर सत्याग्रह व 1942 च्या नागपुरातल्या महीला परिषदेत स्त्रिया मोठया संख्येने सहभागी झाल्या होत्या. लग्न ही मुलीच्या प्रगतीमधली अडचण असून मुलीवर ते लादले जाऊ नये. "लग्नानंतर पत्नी ही नवऱ्याची मैत्रीण व समान अधिकार असलेली सहचारिणी असायला हवी. ती नवऱ्याची गुलाम व्हायला नको." असे ते म्हणत. बायको कशी असावी, याबाबत पुरुषाचे मत घेतले जाते, तद्वतच स्त्रीचेही नवऱ्याविषयीच मत, आवडी–निवडी विचारत घेतल्या पाहिजेत." असे त्यांचे स्पष्ट मत होते.

भारतीय राज्यघटनेतील प्रस्तावना, मूलभूत अधिकार, राज्याच्या धोरणाची तत्वे आणि निश्चित वर्गाकरिता विशेष तरतुदी हे भाग शोषित, वंचित समूहाच्या अस्तित्वाशी संबंधहत भाग आहेत, त्यांना मुख्य सामाजिक आणि राजकीय प्रवाहात सामील करून घेणारे आहेत. डॉ. आंबेडकरांच्या राजकीय तत्वज्ञानाचे प्रतिबिंब प्रस्तावनेमध्येच दिसते. त्यात व्यक्तीची प्रतिष्ठा हा शब्दप्रयोग अत्यंत महत्वाचा आहे. कारण त्याशिवाय लोकशाहीची मूल्ये केवळ निरर्थक ठरतात. त्यांचा संघर्ष हा मानवाच्या प्रतिष्ठेचाच होता. जी प्रस्थापित व्यवस्थेत दिसत नव्हती.

दलित–शोषित–वंचित समाजाचे काळजीपूर्वक शैक्षणिक आणि आर्थिक हितसंवर्धन करून त्यांचे सर्व प्रकारच्या शोषणापासून संरक्षण करून त्यांना सामाजिक न्याय मिळवून देण्याचे प्रयत्न ही सरकारची जबाबदारी आहे. डॉ. आंबेडकरांचा विचार होता, त्याचप्रमाणे हया समूहात स्वाभिमान निर्माण व्हावा, त्यांच्या मानसिक आरोग्याकरिता त्यांचे शारीरिक आरोग्य सुधारणे गरजेचे आहे. याकडे योग्य लक्ष देऊन शासनाने तसे धोरण राबवण्याचे निर्देश अनुच्छेद 46 व 47 मध्ये दिलेले आहेत. स्वघटनेतील अशा विविध तरतुदींमधून डॉ. बाबासाहेबांनी आधुनिक भारताच्या सर्वांगीण विकासाचा पाया घातला आहे.

थोडक्यात, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अथक परिश्रमामुळे व अभेद्य सामाजिक चळवळामुळे अनेक दलित, शोषित आणि वंचित घटकातील मोठया वर्गाला मुख्य समाजप्रवाहात येण्याचा व मान सन्मानाचे जीवन जगण्याचा अधिकार मिळाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला लोकशाहीची मूल्ये दिली. त्या मूल्यांमुळेच आज भारत देशाच नाव विश्वात आदर्शाने घेतले जाते ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दिलेली केवढी मोठी देणगी होय!

**संदर्भसूची**

1. दीक्षा (सकाळ) 2009
2. लोकराज्य, एप्रिल 2016
3. लोकराज्य, डिसेंबर 2017
4. जनतेचा महानायक (जयंती विशेषांक) 2014
5. https://mr.wikipedia.org/wiki

Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar


Peer-Reviewed & Refreed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

## Human Rights : Reality & Challanges

**SPECIAL ISSUE**

December-2020




**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
**Director**
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
Dr. Sandip B. Kale
Coordinator
HOD. Dept. Of Political Science
Yeshwant Mahavidyalaya Seloo
Dist. Wardha

**Executive Editor:**
Dr. Archana S. Dahane
Officiating Principal
Yeshwant Mahavidyalaya Seloo
Dist. Wardha

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

(SJIF) Impact Factor-7.675

ISSN-2278-9308

# B.Aadhar


Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

**December-2020**

**SPECIAL ISSUE-No-CCLIX (259)**

## Human Rights : Reality & Challanges




**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
Dr. Sandip B. Kale
Coordinator
HOD. Dept.Of Political Science
Yeshwant Mahavidyalaya Seloo
Dist. Wardha

**Executive Editor :**
Dr. Archana S. Dahane
Officiating Principal
Yeshwant Mahavidyalaya Seloo
Dist. Wardha

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

| | | |
|---|---|---|
| 46 | मानवी हक्क आणि बाल मजूर **प्रा. डॉ. संध्या चर्जन** | 209 |
| 47 | स्त्रीहक्क आणि हिंसेचे वास्तव **डॉ. रिता धांडेकर** | 215 |
| 48 | बालकामगार व मानवी हक्क **प्रा. डॉ. मंजुषा ह. धापुडकर** | 219 |
| 49 | आदिवासी समाज आणि मानवाधिकार **डॉ. हिरांचद वेस्कडे / प्रा. विलास विश्वनाथ मेश्राम** | 222 |
| 50 | महिला सबलीकरण आणि त्यांचे मानवी हक्क **डॉ. राजेद्र कोरडे** | 232 |
| 51 | How Tribes of Jharkhand can ensure their Human Rights are Recognised and Protected **Dr.SM Wagh / Satyendra Kumar** | 234 |
| 52 | मूल अधिकार **प्रा डॉ कुलकर्णी वनिता बाबुराव** | 237 |
| 53 | महिला आणि मानवाधिकार **डॉ. मनिषा दत्तात्रय पवार** | 240 |
| 54 | भारतीय संविधान आणि मानवी हक्क **श्री. निलेश नरेंद्र खैरनार** | 243 |

# महिला सबलीकरण आणि त्यांचे मानवी हक्क

डॉ. राजेंद्र कोरडे
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वरवट बकाल    ता. संग्रामपुर जि. बुलढाणा

अंधारातून मार्गक्रमण करतांना पथदर्शनासाठी दिव्याची गरज पडते. ही गरज माणूस वेगवेगळया माध्यमातून उर्जा मिळवून पूर्ण करतो. म्हणेनच मानवी जीवनात उर्जेला सर्वाधिक महत्व आहे. आपली दैनंदिन दिनचर्या ते जीवन व्यवहार सुरळीत पार पाडण्यासाठी मानवाला उर्जा ही प्रेरणा आहे. अशीच प्रेरणा मानवी हक्कातून मिळते. जी मानवी जीवन जगण्यासाठी आवश्यक ठरते. जन्मानेच माणूस काही हक्क घेऊन येतो. या गृहितकृत्यावर या हक्काची मांडणी करण्यात येते. व्यक्तीचा सर्वांगिण उत्कर्ष, सुखी व उंच्च जीवनमान जगण्याची व्यवस्था काही मुलभूत हक्क प्राप्त करुन दिल्यासच शक्य असते.

मानवी हक्काचा सेंट थॉमस ॲक्वायनस हा महान ग्रीक तत्ववेत्ता जनक मानला जातो. प्रत्येक व्यक्तीला आपल्या अंतःप्रेरणेनूसार जीवन जगण्याची आणि त्याचा विकास घडवून आणल्याचे स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. या आग्रहातून या संकल्पनेचा उदय झालेला आहे.

जगातील मानवी समाजात विविधता आहे. समाजात वंशिक, धार्मिक, भाषिक इत्यादी प्रकारची विविधता आहे. त्या शिवाय स्त्री आणि पुरुष यांच्यात भिन्नता आहे. समाजातील विविधतेत एकात्मता असेल तर विविधतेला वैभवसंपन्न स्वरुप प्राप्त होते. मानवी समाजाचे कल्याण हे एकमेव उदात्त उद्दिष्ट मानवजातीने डोळयासमोर ठेवले तर मानवजातीला वैभवाच्या दिशेने वाटचाल करता येईल. मात्र त्यासाठी लिंग, धर्म, भाषा इत्यादीतील वेगळेपणा हा सर्वांनी गौण मानला पाहिजे. सर्वांनाच जीवन जगण्याचा अधिकार व स्वातंत्र्य आहे.

मानवी सभ्यतेचा विकास साम्यवाद व समाजवादी विचारसरणीचा स्विकार, शिक्षण, विज्ञानाचा प्रचार व प्रसार याव्दारे २० व्या शतकात महिलांची समानता तसेच भूमिकेच्या मुद्दावर जागृतीचे स्वर जवळपास सर्वच देशात तयार झाले. धर्म, राजकारण व सत्ता या सर्वांना विसाव्या शतकात हे स्विकारावे लागले की, महिलाचे स्थान हे पुरुषाबरोबरीचे आहे. देशातील कोणताही अधिकार किंवा कायदा असा नाही की, जो स्त्रीला दुय्यम श्रेणी नागरीकांचा दर्जा देईल. स्त्रियांना देखील एक स्वतंत्र व्यक्तीमत्व म्हणून जगता येते.

मानवी हक्क मानवाचे जन्मसिध्द अधिकार आहेत. त्यांचे संरक्षण व त्याचा प्रचार व प्रसार सरकारची प्राथमित जबाबदारी आहे. महिला व मुलीचे हक्क हे विश्वव्यापी मानवी हक्कांचे अहस्तांतरणीय अनिवार्य आणि अविभाज्य अंग आहेत. महिला आणि मुलींचे मानवी हक्क आणि मुलभुत स्वातंत्र्याचा पूर्ण समान अधिकार मिळवून देणे ही सरकार आणि संयुक्त राष्ट्राची जबाबदारी आहे.

यामूळे मानवी हक्कातून स्त्रीची परिस्थिती बदलली का? हे पाहणे हा संशोधनाचा उद्देश आहे.

हे उद्देश खालील प्रमाणे आहेत :

१) मानवी हक्क आणि महिला सबलीकरणाच्या संदर्भात माहिती देणे.

२) मानवी सबलीकरणाच्या मार्गात येणाऱ्या अडचणी दर्शविणे.

३) महिला सबलीकरणासाठी वेगवेगळे मार्ग सांगणे.

४) महिलामध्ये त्यांच्या सामाजीक, आर्थिक व राजकीय हक्कांविषयी जागृती निर्माण करणे.

५) सबलीकरणातील अडचणींचा अभ्यास करुन उपाय सूचविणे.

देशाला जर खरोखरच महासत्येच्या दिशेने वाटचाल करायची असेल तर स्त्री-पुरुष ही दरी मिटविण्याची गरज आहे. स्त्रीला देखील एक माणूस म्हणून जगता आले पाहीजे. यासाठी समाजाच्या मनोवृत्तीमुळे अमुलाग्र परिवर्तन होणे गरजेचे आहे. जोपर्यंत स्त्रियांकडे हीन दृष्टीने पाहिले जाईल तोपर्यंत महिला सबलीकरण ही एक मृग-तृष्णाच राहणार आहे. यासाठी समाजाला जागृत करणे गरजेचे आहे. सरकारनेही समाज जागृतीसाठी वेगवेगळे उपक्रम राबविणे आवश्यक

[illegible]

[illegible]

- [illegible]
- [illegible]
- [illegible]
- [illegible]

[illegible]